प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. २६ जुलै २०२४**

# सिडकोतर्फे नवी मुंबईसह नैना क्षेत्रामध्ये सन २०२१-२४ दरम्यान ५ हजारांहून अधिक अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांचे निष्कासन

## डेब्रिज टाकणे, माती चोरी प्रकरणांतही दाखल करण्यात आले गुन्हे

सिडकोतर्फे सन २०२१ ते २०२४ दरम्यान नवी मुंबई आणि नैना क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, होर्डिंग्ज, क्रशर, डेब्रिज, माती चोरी इ. विरुद्ध धडक कारवाई करण्यात आली. या कारवायांदरम्यान ५ हजारांहून अधिक अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली. तसेच अनधिकृतरीत्या डेब्रिज टाकणे, माती चोरी, अवैध वाहतूक प्रकरणी ४८ गुन्हे दाखल करण्यात आले असून १२४ वाहनांवर जप्तीची कारवाई करण्यात आली. सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी, श्री. सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखाली सदर मोहिम पार पडत आहे.

**“नवी मुंबई एक सुनियोजित शहर असून या शहराची अनिर्बंध वाढ रोखणे हे सिडकोचे प्रमुख कर्तव्य आहे. या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सिडकोने नेहमीच कठोर पाऊले उचलली आहेत. त्याअंतर्गतच सध्या सिडकोतर्फे मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई सुरू आहे.”**

**श्री. विजय सिंघल**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक**

कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून जानेवारी २०२० ते जून २०२४ या कालावधीमध्ये अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधात एकूण ९६८ निष्कासन मोहीमा राबविण्यात आल्या. निष्कासन कारवाई करण्यापूर्वी अनधिकृत बांधकाधारकांना/अतिक्रमणधारकांना एमआरटीपी अंतर्गत नोटीसा बजावून बांधकाम निष्कासित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या.

या कारवायांदरम्यान एकूण २५८ आरसीसी बांधकामे, ६४० वीट बांधकामे, ४,५८७ तात्पुरत्या स्वरूपाची अतिक्रमणे/झोपड्या, २४४ होर्डिंग्ज व १५ क्रशर यांविरुद्ध निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे. सिडकोच्या भूखंडांवर अवैधरीत्या डेब्रिज टाकण्या प्रकरणी एकूण ४५, माती चोरी/अवैध वाहतूक प्रकरणी ३ गुन्हे दाखल करण्यात येऊन एकूण १२४ डंपर/ट्रक/पोकलेन/जेसीबी/डोझर ही वाहने जप्त करण्यात आली आहेत.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**मा. संपादक महोदय,**

**वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.**

**जनसंपर्क विभाग, सिडको**